# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ०२-२३** **दिनांक ०३/०१/२०२३**

## मटका जुगार चालवणाऱ्या आरोपीतांविरुध्द कारवाई करुन ८,४७,६५०/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत-अर्नाळा पोलीस ठाण्याची कारवाई

अर्नाळा सागरी पोलीस ठाणे हद्दिमध्ये देव रेसीडेन्सी बिल्डींग, पदमावती नगर विरार (प) येथे काही इसम बेकायदेशीररित्या आकडयावर पैसे लावुन मटका जुगार चालवत असल्याची दिनांक ०२/०१/२०२३ रोजी १६.१० वाजताच्या सुमारास गुप्त बातमीदारकडून माहिती मिळाली होती. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने अर्नाळा पोलीस ठाण्याच्या पथकाने छापा कारवाई केली असता, एक इसम मोबाईलवरुन कोणास काहितरी आकडे सांगत असल्याचे व दोन इसम मोबाईलवर काहितरी करत असल्याचे दिसुन आल्याने सदर इसमांचे मोबाईल चेक केले असता त्यांच्या मोबाईलमध्ये मटका जुगाराचे आकडे दिसुन आले व दुसऱ्या इसमाजवळ कागदावर आकडे व पैसे लिहिलेले आकडे दिसुन आले. सदर कारवाई दरम्याने १) ००,००/- रु.कि.चे रजिस्टरचे पेपर त्यावर मटका जुगाराचे वेगवेगळे तारखेचे आकडे लिहलेले एकुण ३७ पेपर जु.वा.कि.सु २) १२,०००/- रु.कि.चे HP link Tank Wireless 419 चे कलर प्रिंन्टर जु.वा.कि.सु ३) १०,०००/- रु.कि.चा विवो कंपनीचा मोबाईल, ३) १०,०००/- रु.कि.चा विवो कंपनीचा स्काय ब्लु रंगाचा मोबाईल ४) १०,०००/- रु.कि.चा रेडमी कंपनीचा स्काय ब्लु रंगाचा मोबाईल ५) १०,०००/- रु.कि.चा रेडमी कंपनीचा केशरी रंगाचा मोबाईल व ६) ७,९५,६५०/- रुपये रोख रक्कम असा एकुण ८,४७,६५०/- रुपये एकुण किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने सदर गुन्हयाचे तपासकामी जप्त करण्यात आला आहे.

सदर कारवाईमध्ये आरोपीत नामे १) हितेन सुरेश सोमय्या, वय ४२ वर्ष, २) सुरेश मगनलाल सोमय्या, (३) मुकेश सुरेश सोमय्या, वय ४७ वर्ष, पदमावती नगर, बोळींज, विरार (प), ता. वसई, जि. पालघर यांचे विरुध्द अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.नं ॥ ०३/२०२३ महाराष्ट्र जुगार अधिनियम १२ (अ) प्रमाणे दिनांक ०२/०१/२०२३ रोजी १९.३३ वाजता गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री. चंद्रकांत जाधव, सहायक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली अर्नाळा सागरी पोलीस ठाणेचे श्री. राजु माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/ रणजितसिंग परदेशी, सफौ/ जनार्दन मते, पोहवा/शिवराम डामरे, पोहवा/ राजेंद्र पवार, पोअं/ राहुल कदम यांनी केली आहे.

-------------ooooo-------------